पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे
अंक १६ वा
२१ डिसेंबर १९९४

## मावळे इतिहास घडवीत आहेत

आपल्या वाडवडिलांच्या पिढ्या ज्या जमिनीवर वाढल्या त्या जमिनी सरकारी कायद्यांचा आधार घेऊन महाराष्ट्र शासन कवडीमोलाने संपादन करीत आहे हे कळताच चिखली-कुदळवाडीतील खऱ्या अर्थाने स्वतंत्र असलेल्या शेतकऱ्यांनी १९७० सालापासून शासनाच्या या कारवाईविरूद्ध लढा उभारला आहे.

भू-संपादनाच्या नोटिसीचा डाग लागल्याने त्यांच्या तारणावर कर्ज मिळेनासे झाले, त्यांची विक्री करता येईना म्हणून कालांतराने काही शेतकऱ्यांनी पराभव मान्य करून शासनाने दिलेल्या तुटपुंज्या रकमेवर आपली काळी आई शासनाहाती सोपविली आणि नोकरीहमालीच्या पारतंत्र्यात आपल्या पोराबाळांना ढकलले.

लढा चालूच होता. जानेवारी ९३ मध्ये मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी एकतर्फी घोषणा करून, निवासी कामाकरिता शेतकऱ्यांकडून काढून घेतलेल्या जमिनीपैकी शंभर एकर (नंतर वाढवून एकशे अठ्ठ्याऐंशी एकर) जमीन प्राधिकरणाने टेल्कोला ११ लाख रुपये एकर या प्रमाणे विकण्यास परवानगी देऊन टाकली, (हपापाचा माल गपापा!) शेतकऱ्यांना १९७० साली किंमत दिली होती एकरी चार हजार रुपये.

शेतकरी खवळले. प्राधिकरण व शासन यांच्या विरूद्ध पुन्हा लढू लागले. साम-दाम-दंड-भेदाचा वापर करून शासनाने लढा दडपण्यास सुरुवात केली. आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी धडपडणारे शेतकरी हवालदिल झाले. त्यांनी शेतकरी संघटनेला हाक दिली.

२७ मे १९९३ रोजी चिखली येथे शेतकरी संघटनेने 'शिवार संरक्षण परिषद' भरवली. महाराष्ट्रभरातून वीस हजारांहून अधिक शेतकरी परिषदेला हजर होते. वीस-बावीस वर्षे

# जमीन आमची भाव आमचा

**— शरद जोशी**

### विषम लढा

चिखली-कुदळवाडी सुमारे १५०० लोकसंख्येचे छोटेसे गाव. पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्गापासून नाशिककडे जाणारा राष्ट्रीय महामार्ग फुटतो, त्या दुबेळक्यात भोसरीची उद्योगमहानगरी आणि भोसरी गाव वसले आहे. देशातील सगळ्यात मोठ्या औद्योगिक वसाहतींपैकी ही एक. पिंपरी-चिंचवड महानगर-पालिकेच्या क्षेत्रात ही वसाहत येते आणि त्यामुळे ही महानगरपालिका हिंदुस्थानातील सर्वात श्रीमंत समजली जाते. औद्योगिक वसाहतीची हद्द संपते तेथे टाटांच्या टेल्को कंपनीचा, ट्रक तयार करण्याचा कारखाना आहे. हिंदुस्थानातील हा सर्वात मोठा कारखाना. कारखान्याच्या पूर्वपश्चिम कुंपणाच्या भिंतीला लागून एक डांबरी सडक जाते, तिथे चिखली-कुदळवडी गाव आहे. चिखलीला लागून पंढरीच्या वारकऱ्यांचा देहू-आळंदी रस्ता जातो. त्या रस्त्याला ही सडक मिळते. टेल्कोच्या भिंतीची संगत सुटल्यानंतर सडक आपला गुळगुळीतपणा, तुकतुकीतपणा सोडून देते. गावातून जाणारा रस्ता आपला कच्चा, ओबडधोबड, खाचगळग्यांनी भरलेला; आणि पावसाळ्यात चिखलाने भरून जाऊन गावाचे चिखली नाव सार्थक करणारा.

१५ मे १९९३ पासून गावाचा रंग एकदम बदलला आहे. तरुण पोरे छातीवर अभिमानाने शेतकरी संघटनेचा बिल्ला लावून फिरत आहेत. सडकेच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींवर संघटनेच्या घोषणा रंगवल्या जात आहेत. 'शेतकरी संघटनेचा विजय असो', 'आमची जमीन, आमचा भाव.' चिखली गाव लवकरच संपणार आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी पिंपरी-चिंचवड महानगरीच्या पसरत्या विळख्यात नष्ट होणार आहे. तेथे आधुनिक कारखानदारी आणि छानछोकीचे विलासी बंगले, गाळे उभे राहणार आहेत. हिंदुस्थानातील सर्वात श्रीमंत महानगरीच्या पोटांत चिखली गिळंकृत होणार आहे. चिखलीचे शेतकरी जाणार कोठे? टेल्कोच्या शेजारी, मजुरीच्या दरांची स्पर्धा करून शेती करणे शक्य नाही. नव्या कारखानदारीत रोजगार मिळण्याची शक्यता जवळजवळ शून्य. शेकडो वर्षे पूर्वजांच्या पिढ्या जिने पोसल्या ती जमीन सोडून देतांना त्या जमिनीच्या किंमतीतून पुन्हा पायावर उभे राहता यावे एवढीच तिथल्या गावकऱ्यांची इच्छा आहे. पण ही इच्छासुद्धां पुरी होणे आजतरी अशक्य दिसते आणि ते शक्य करण्याकरिता शेतकरी संघटनेच्या झेंड्याखाली शेतकरी एकजूट करत आहेत. लढा फार विषम आहे. एका बाजूला मूठभर शेतकरी दुसऱ्या बाजूला पिंपरी-चिंचवड नगरविकास प्राधिकरण (पिचिंप्रा), तिचे अध्यक्ष श्रीनिवास पाटील आणि श्रीनिवास पाटलांचे वर्गमित्र, देशभर भूखंड व्यवहारातील कौशल्याकरितां गाजलेले देशाचे माजी रक्षामंत्री सध्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. शरदचंद्रावजी पवार.

### शेतकऱ्याला निर्वासित करणारा भूखंड-व्यापार

भूखंडाचे अर्थकारण सगळ्या मोठ्या शहरांतील राजकारणाचा पाया झाले आहे.

खेडी ओसाड पडत आहेत. खेड्यातील लक्ष्मी 'नेहरूनीती'प्रमाणे लुटून शहरात आणून टाकली जात आहे, कारखानदारीची वाढ तेथे

**स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवून आपल्या जमिनीचे रक्षण करणाऱ्या, ती फुलती, फळती ठेवणाऱ्या या शेतकऱ्यांवर पुढे अन्याय झाला तर शेतकरी संघटना मशाल बनून या शेतकऱ्यांच्या मदतीला येईल असा शब्द श्री. शरद जोशींनी या परिषदेच्या व्यासपीठावरून दिला.**

**परिषद झाल्याबरोबर सरकारी कारवाया थंड झाल्या. चिखली- कुदळवाडीच्या शेतकऱ्यांनी न्यायालयाकडून आपला जमिनीवरील मालकी हक्क शाबित करून घेण्यासाठी न्यायालयीन लढाई सुरू केली. खालच्या कोर्टातून वरच्या कोर्टात, वरून परत खाली किंवा त्याच्याही वर. सामान्य नागरिकाला यथेच्छ लुटता यावे, लुटल्या गेलेल्यास तक्रारीची संधी राहू नये यासाठी, प्रत्येक नागरिकाला मालमत्तेचा हक्क देणाऱ्या घटनेमध्ये सत्तेच्या बळावर मोडतोड करणाऱ्या व्यवस्थेविरूद्धच्या या लढाईत व्हायचे तेच झाले. लढणाऱ्या शेतकऱ्यांची ससेहोलपट. पण, चिखलीतल्या काही बहाद्दर शेतकऱ्यांनी हिम्मत सोडली नाही. ते लढत राहिले.**

**मुंबई उच्चन्यायालयाने दिलेल्या एका निकालाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात या प्राधिकरणग्रस्त शेतकऱ्यांनी अर्ज केला होता. त्याचा निकाल अजून लागावयाचा होता. पण, ३० नोव्हेंबर १९९४ रोजी संबंधित जमिनीपैकी एका शेतात 'टेल्को'चा एक बुलडोझर सपाटीकरणासाठी शिरला. त्यावेळी त्या जमिनीची मालकीण सौ. लक्ष्मीबाई साळुंके खुरपत होती. आवाज ऐकताच माऊली धावली आणि बुलडोझरच्या समोर बसली. आजूबाजूला मदतीला कोणी नाही. धीटाईनं म्हणाली, 'माझ्या अंगावरून तुमचा बुलडोझर गेला तरी चालेल, पण माझ्या जमिनीत तुम्हाला काही करू देणार नाही.' बुलडोझर बरोबरच्या गडीमाणसांनी तिला उचलून बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करताच तिनं आरडाओरडा केला. तो ऐकताच आसपासच्या शेतात काम करीत असलेली माणसे धावत आली आणि झाला प्रकार पाहाताच संतप्त झाली. त्यांचा संताप पाहाताच टेल्कोच्या लोकांनी पळ काढला.**

**९ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने, संबंधित जमिनीत पिके घेतली जातात, त्यात शेतकऱ्यांची वहिवाट आहे; प्राधिकरणाचा त्या जमिनीशी काही संबंध नाही इत्यादि तपशील तपासणे आपल्या अखत्यारीत येत नसल्याचे**

होते आहे. आपल्या हरवलेल्या लक्ष्मीच्या शोधात शेतकरी पोरे निर्वासित बनून झुंडीच्या झुंडीने शहरात येत आहेत. शहरे फुगत आहेत, तिथल्या जमिनीला सोन्याचा भाव येत आहे. शहरांच्या वाढत्या सीमांच्या आसपासच्या जमिनी खाजगी बिल्डर आणि दलाल विकत घेतात, अगदी मातीमोल भावाने, एकगठ्ठा, अगदी एकरच्या एकर विकत घेतात. त्यांचे प्लॉट पाडून पाण्याची, सांडपाण्याची, विजेची, रस्त्यांची सोय करतात. मग हेच प्लॉट शेतकऱ्यांना मिळालेल्या किंमतीच्या दोनशे, पाचशे, हजार पट भावाने चौरस फुटाच्या हिशोबाने विकले जातात. शहरीकरणात जमिनीच्या वाढणाऱ्या किंमतीचा फायदा शेतकऱ्याला मिळत नाही. तो निर्वासित बनतो, देशोधडीला लागतो आणि त्याच्याच जमिनीवर आठवड्याभरात बिल्डर लोक मालेमाल होऊन जातात. या लोकांची ताकद फार मोठी. सरकारी अधिकारी, पोलिस यांना ते पोसतात. स्थानिक पुढारी त्यांच्या तालावर नाचतात आणि मोठ्या नेत्याशीही या लोकांचे संपर्क फार घनिष्ठ. या नेत्यांच्या सहकार्याखेरीज इमारती बांधण्याचा आणि भूखंडाचा व्यापार फायदेशीर होऊच शकत नाही.

## परिसाहून थोर, भूखंड व्यापार

शहराची सीमा जवळ आली की आसपासची खेडी शहराच्या हद्दीत घेतली जातात. दीडदोन एकरांचा छोटा शेतकरी एका दिवसात शहरी कमाल भूधारणा कायद्याखाली जमीनदार ठरतो. जमिनीच्या देवघेवीचा, खरेदीविक्रीचा, हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार ठप्प होतो. वेगवेगळ्या कारणांनी अडकलेल्या जमिनी एजंट लोक मातीमोलाने खरीदतात, सरकार दरबारीचा आपला स्नेहसंबंध वापरून कचाट्यात सापडलेल्या जमिनी मोकळ्या करून घेतात. जमिनीच्या स्थितीबद्दल आणि उपयोगाबद्दल फेरफार करण्याचा सरकारी अधिकार म्हणजे लोखंडाचे सोने करणाऱ्या परीसाहूनही अधिक सामर्थ्यशाली ठरला आहे. कारखानदारी, आयात-निर्यात यांच्याकरिता लायसेंस-परमीट मागायला येणारे लोक फार थोडे. असे लायसेंन्स-परमीट देणाऱ्यांना काय फायदा मिळत असेल, इतका गडगंज नफा जमिनीच्या फेरफारावर सरकारी शिक्का उठवणारे पुढारी आणि अधिकारी मिळवतात. पण, दलालांच्या जमिनी मोकळ्या करण्याबद्दल कमीशन खाऊन मंत्र्यांची, पुढाऱ्यांची भूक थोडीच भागणार आहे? त्यांना स्वतःच्या नावाने या हिरेमाणकांच्या खाणीतील संपत्ती मिळवायची आहे. शिस्तबद्धपणे पुढाऱ्यांनी हा भ्रष्टाचार चालवला आहे. सरकारच्या हाती 'भूमीसंपादन कायदा' नावाचे एक कोलीत आहे. अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय, आर्थिक, सामाजिक कामाकरिता जमिनी संपादन करण्याचा अधिकार या कायद्याने सरकारला दिला आहे. या अधिकाराचा उपयोग एका काळी फार बेताबेताने होत असे. पण, स्वातंत्र्यानंतर भूमीसंपादनाचा रणगाडा बेफाम उधळू लागला आणि त्याखाली चिरडले गेले ते सगळे शेतकरीच.

## विक्राळ सुल्तानी भू-संपादन कायदा

कोणत्याही सरकारी, निमसरकारी, सहकारी किंवा सार्वजनिक संस्थेकरितां भूसंपादन कायद्याचा वापर केला जातो. शेकडो नाही, हजारो एकर जमीन सरकार ताब्यात घेते. जीवनावश्यक वस्तूंच्या कायद्याप्रमाणेच हा शेतकरीविरोधी कायदा अत्यंत विक्राळ सुल्तानी आहे. यात शेतकऱ्यांच्या विनंतीअर्जांना स्थान नाही, केविलवाण्या आक्रोशाला स्थान नाही. या जमिनीची गरज सार्वजनिक कामाकरितां आहे एवढे एखाद्या जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असले की कोणाचे काही चालत नाही.

जमिनी संपादन करण्याचा अधिकार कठोर, तर त्या जमिनीचा मोबदला ठरवण्याचा अधिकार महाकठोर. एका काळी जमिनीच्या किंमती महसुलाच्या पटीत ठरवल्या जात. त्यानंतर अलिकडे नोंदणी झालेल्या खरेदीविक्री व्यवहारात ठरलेल्या किमतींच्या आधाराने मोबदल्याची किंमत ठरवली जाऊ लागली. सगळ्या जगभर खेड्यापाड्यात आणि शहरांतसुद्धा नोंदणी झालेली किंमत अपुरी असते, हे जगप्रसिद्ध आहे. तरीदेखील अशा मोडक्यातोडक्या आधारानेच शेतकऱ्यांच्या जमिनी शासन हस्तगत करते. नोंदणीच्या वेळी सरकारला मिळणारे स्टँप फीचे उत्पन्न कमी होऊ नये म्हणून काही वर्षांपूर्वी सरकारने प्रत्येक गावात वेगवेगळ्या भागाकरितां स्टँप फीची रक्कम आकारण्यासाठी खरेदीविक्रीच्या प्रमाणित किंमती ठरवून दिल्या आहेत. सरकारी

**सांगून हा अर्ज मागे घेण्याची शेतकऱ्यांना अनुमती दिली आणि उच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे तपशील तपासण्यासाठी जिल्हा दिवाणी न्यायालयाकडे जाण्याचा सल्ला दिला.**

**हा निकाल म्हणजे शेतकऱ्यांच्या विरुद्ध निकाल असे ठरवून १३ डिसेंबर रोजी प्राधिकरणाने आपला लवाजमा जमिनीवर परत उतरविला. सोबत, प्राधिकरणाचे अधिकारीही त्यांची पाठराखण करावयास आले होते. याची कुणकुण आधीच लागलेली असल्याने चिखलीचे शूर शेतकरी आपल्या जमिनीच्या रक्षणासाठी सज्ज होते. सुमारे दीडदोनशे शेतकरी टेल्को व प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना आडवे झाले व त्यांनी शेतात काम करण्यास हरकत घेतली. त्यावेळी मोठा संघर्ष उडाला. शेवटी टेल्को व प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी माघार घेऊन काढता पाय घेतला. शेतकऱ्यांनी पोलिस स्टेशनमध्ये अतिक्रमणाची तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला पण पोलिसांनी ती दाखल करून घेण्यास नकार दिला; टेल्कोने दिलेली तक्रार मात्र दाखल करून घेण्यात आली. (चोराच्या बोंबा)**

**या पार्श्वभूमीवर नुसते 'शिवार संरक्षण'च नव्हे तर शेतकऱ्यांच्या सर्व हक्कांच्या संरक्षणाची रणनीती आखण्यासाठी शेतकरी संघटनेतर्फे चिखली-कुदळवाडीच्या लढवय्या शेतकरी सैनिक स्त्रीपुरूषांच्या सन्मानार्थ शेतकरी संघटनेचे ठिय्या आंदोलन २५ डिसेंबर १९९४ रोजी, हे लढवय्ये सैनिक ज्या भूमीने जोपासले त्या भूमीवर सुरू होत आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेशातील शेतकरी कापूस एकाधिकारी धुडकावून अन्य राज्यात चढ्या भावाने कापूस विकत इतिहास घडवीत आहे; बुलढाणा, धुळे, नगर जिल्ह्यातील ऊसशेतकरी झोनबंदी तोडून इतिहास घडवीत आहेत; चिखली-कुदळवाडीचे शेतकरी आपल्या जमिनीचे नेहरूनीतीचा वरदहस्त लाभलेल्या गुंड अधिकारी व पुढाऱ्यांपासून रक्षण करत इतिहास घडवीत आहे. स्वातंत्र्याच्या रक्षणाकरिता इतिहास घडविणाऱ्या शूर शेतकऱ्यांचे संमेलन म्हणजे हे ठिय्या आंदोलन आहे.**

**'शिवार संरक्षणा'ची भूमिका श्री. शरद जोशींनी २७ मे ९३ च्या परिषदेत सविस्तर मांडली होती. तीच उजळणीसाठी पुनर्मुद्रित करीत आहे.**

कामासाठी जमीन संपादन करतांना मात्र या प्रमाणित किंमतीचा वापर केला जात नाही.

### भूखंडव्यवहारांचे अतिजहाल मिश्रण

शेतकऱ्यांना देशोधडी लावले आणि जमीन खात्याच्या किंवा संस्थेच्या ताब्यात आली की मग पुढारी आणि त्यांची दोस्त मंडळी त्या जमिनींचे लचके तोडतात. महाराष्ट्रात अनेक संस्थाचा प्रमुख उद्योगच मुळी संपादन केलेल्या जमिनी गिळंकृत करणे हा आहे. पुण्याच्या कृषि उत्पन्न बाजार समितीचे उदाहरण, मासला म्हणून पुरेसे आहे. गुलटेकडी येथील, शेतमालाच्या बाजारासाठी प्रचंड जमीन सरकारने या संस्थेच्या हाती दिली. कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा म्हणून आजपर्यंत काहीही केलेले नाही. पण, समितीच्या अधिकारातील जागा पुढाऱ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या आप्तसंबंधियांना बहाल करण्याचा सपाटा मात्र चालवला आहे. शेतमालाच्या बाजाराकरिता संपादन केलेली जमीन दारूचे गुत्ते, हॉटेल, मोटारसायकली, मोटारगाड्या यांची दुकाने, गॅस एजन्सी असल्या वाटेल त्या कामाकरिता दिली आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या अधिकारातील जमीन बिगरशेती करण्याची गरज नसते आणि शहरी कमाल धारणेचा कायदाही तिला लागू पडत नाही. म्हणून मोठे मोठे पुढारी समितीकडून जागा ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने घेतात.

शेतकऱ्यांच्या सोयीसाठी एक एकराची जागा राखून ठेवलेली होती. एक दिवस समितीने एका बैठकीत ऐन वेळचा विषय म्हणून या जमिनीचा प्रश्न विचारात घेतला आणि एका ट्रस्टला ती जमीन किरकोळ मोबदला घेऊन देऊन टाकली. ज्या दिवशी हा ठराव झाला त्या दिवशी असा कोणता ट्रस्ट अस्तित्वातच नव्हता. असा ट्रस्ट करण्यासंबंधीचा अर्ज धर्मादाय आयुक्तांकडे दाखल झाला तोच मुळी जमिनीच्या घबाडासंबंधी समितीचा ठराव झाल्यानंतर! या ट्रस्टने शेतकऱ्यांच्या सोयीचे कोणते काम केले? तर त्या प्लॉटवर एक मंगल कार्यालय बांधले. या मंगल कार्यालयाचे रोजचे भाडे बारा ते वीस हजार रुपये आहे. शेतकऱ्यांच्या भल्याच्या काही चुटपूट हालचाली हा ट्रस्ट दाखवतो पण शेतकऱ्यांना देशोधडीला लावून त्यांच्या गिळंकृत केलेल्या जमिनीवर खोऱ्याने पैसा ओढण्याचे काम हा ट्रस्ट करतो. या संबंधी मुंबई उच्च न्यायालयाने चौकशी समिती नेमावी असा आदेश महाराष्ट्र शासनाला दिला होता. तो कोर्टाचा आदेश धुडकावून लावण्यात आलेला आहे. चौकशीची सुरुवातसुद्धा झालेली नाही. कारण कदाचित हे असावे की, या ट्रस्टचे प्रमुख आहेत माननीय शरदचंद्ररावजी पवार!

दलाल आणि पुढारी यांच्या भूखंडव्यवहारांचे मिश्रण अतिजहाल झाले आहे. मुंबईत अलीकडे घडलेले दंगे, खरे म्हटले तर, जातीय नव्हते. झोपडपट्ट्यांनी व्यापलेली जागा मोकळी करून तेथे बांधकाम करण्याकरिता दंगेधोपे आणि जळीते नियोजनपूर्वक घडवून आणण्यात आली होती आणि यात थोरथोर नेत्यांचा हात होता हे आता स्पष्ट होऊ लागले आहे.

### मावळ्यांचे गुंडगिरीला आव्हान

या असल्या भयानक आर्थिक, राजकारणी आणि गुंडगिरीच्या सामर्थ्याला आव्हान द्यायला उभे राहिले आहेत मावळातील हे धिटुकले गांव आणि त्यातील मूठभर शेतकरी.

चिखलीत आज जे वादळ उभे राहिले आहे त्याचा इतिहास थोडक्यात सांगण्यासारखा आहे. चिखली गावातील जवळ जवळ हजार एकर जमिनी संपादन करण्यासंबंधी सरकारी अधिसूचना १९७० साली निघाली. याच वेळा पिंपरी-चिंचवडच्या विस्ताराकरिता अशाच अधिसूचना इतरही दहा गावांत निघाल्या. अधिसूचना निघाल्याबरोबर कर्ज देणे बंद झाले, हस्तांतरणाचे सर्व व्यवहार स्थगित झाले.

१९७२ साली पिंपरी-चिंचवड नगर विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले. या प्राधिकरणाचा हेतू 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर निवासी घर बांधणीसाठी प्लॉट उपलब्ध करून देणे हा होता आणि आहे.

१९७६ साली शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शेतकरी संघटना स्थापन केली आणि या संस्थेतर्फे शेतीची जमीन संपादन करण्यास विरोध केला, पण माळरान जमीन देण्याची तयारी दाखवली.

### अल्प भरपाईत भूसंपादनाचा प्रयत्न

१९८६ साली जमीन संपादनाचा आदेश निघाला. सर्वसाधारणपणे जमिनीची किंमत एकरी ४००० रुपये ठरली. त्यावर ३० टक्के

सांत्वना आणि व्याज असे सगळे मिळून शेतकऱ्याला दर एकरी १२ ते १६ हजार रुपये मिळावे असा सरकारी निर्णय झाला. काही अडल्या नडल्या शेतकऱ्यांनी पैसे घेतले, काहींनी यातून सुटका नाही अशा भावनेने निषेध नोंदवून पैसे स्वीकारले. पण, बहुसंख्य शेतकऱ्यांनी पैसे घेतले नाहीत. एवढेच नव्हे तर, जमिनीचा ताबा सोडण्यास नकार दिला. जमीन ताब्यात घेतल्याचा खोटा पंचनामा प्राधिकरणाने कार्यालयात बसून पुरा केला आणि त्यावर पंचाच्या युक्ति-लबाडीने सह्या घेतल्या. याबाबत तपशीलवार माहिती ९ मे ९३ च्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये दिली आहे. हा कागदोपत्री व्यवहार झाला. शेतकरी आपले शेतीचे व्यवहार करतच राहिले. ७/१२ च्या उताऱ्यावर प्राधिकरणाचा कब्जा दाखवण्यात आला, त्याबद्दल शेतकऱ्यांनी निषेध नोंदवला. पण, अन्याय करणारे, निर्णय देणारे आणि त्याची अंमलबजावणी करणारे सगळे एकच. त्यामुळे, ७/१२ च्या उताऱ्यातील फेरफाराबद्दल शेतकऱ्यांनी फार काही गडबड केली नाही.

शेतकरी जमीन कसत राहिले. आजही तेथे शाळूची पिके घेतल्याच्या स्पष्ट खुणा आहेत, गुलाबाची बाग आहे, अशोकाची आणि इतर झाडांची वनशेती आहे आणि चांगली बहरणारी आमराईही डोलत आहे. या काळात तेथे विहीर घेतली गेली. एका शेताला तर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने अगदी अलीकडे, म्हणजे १९९० साली विजेचे कनेक्शनसुद्धा दिले आहे.

### चार हजाराचे अकरा लाख!

चिखलीच्या जमिनीच्या कर्मकथेला नवी कलाटणी मिळाली ती ६ जानेवारी १९९३ रोजी. त्या दिवशी तात्कालीन सरक्षणमंत्री माननीय श्री. शरदचंद्ररावजी पवार पुण्यास भेटीस आले होते. आणि त्यांनी चिखलीच्या जमीनीपैकी १०० एकर जमीन टाटांच्या ट्रक कारखान्याच्या विस्तारासाठी देण्याचे जाहीर केले. एक महिन्याने पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाने टेल्कोला त्याहीपुढे जाऊन १८८ एकर जमीन देण्याचे जाहीर केले. ही जमीन आता निवासी उपयोगाकरिता वापरली न जाता कारखानदारीसाठी वापरली जाईल असा बदलही पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाने जाहीर करून टाकला. या भागात आता जमिनीची किंमत ५० ते ५५ रुपये प्रतिचौरस फूट आहे. पण टेल्कोला, घाऊक गिऱ्हाईक म्हणून, २५ रुपये प्रतिचौरस फूट किंवा ११ लाख रुपये प्रतिएकर भावाने देण्याचा सौदा झाल्याचे समजते. शेतकऱ्यांच्या हाती असतांना ज्या जमिनीची किंमत ४००० रु. एकर होती, ती आता ११ लाख रुपये एकराची झाली!

या सगळ्या व्यवहारात गोलमाल गोंधळ फार मोठा आहे.

१) प्राधिकरणाचे काम 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर निवासी प्लॉट तयार करून देणे हे आहे. कारखानदारी वसाहतींचा विकास हे प्राधिकरणाचे (पिंचिंप्रा) काम नाही.

२) मुळात निवास कामाकरिता जमिनीचे संपादन झालेले असताना दुसऱ्या कोणत्याही कामाकरिता जमिनीचा वापर करणे भूसंपादन कायद्यास धरून नाही. म्हणजे, अयोध्येच्या मंदिराच्या भोवतालची जमीन प्रवाशांच्या सुखसोयीकरीता म्हणून संपादन करायची आणि मग तिथे राममंदिर बनवायचे! हे कायद्याला मान्य नाही. त्यामुळे सर्व भूसंपादनाची कारवाईच रद्दबातल होते. हा बदल घडवून आणण्यासाठी पिंचिंप्राने घिसाडघाईने कारवाई चालवली आहे. या बदलासाठी ज्या अधिकाऱ्यांची संमती आवश्यक आहे, त्यांनी ही ही संमती दिलेली नाही. पण तरीही ही जमीन टेल्कोस देऊन व्यवहार पुरा करण्याची मोठी गडबड उडाली आहे.

### शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढू — शेतकरीपुत्र शरद पवार

चिखलीच्या शेतकऱ्यांनी थोडासा निषेधाचा सूर काढल्याबरोबर सर्व हितसंबंधी मंडळी चवताळून उठली. टाटांच्या कारखान्यातील कामगारांचे पुढारी सरसावून उठले. कारखान्याचा विस्तार झाला पाहिजे, कामगारांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजे, ह्या विस्ताराच्या आड कोणी आले तर ते खपवून घेतले जाणार नाही अशी भाषा ते वापरू लागले.

कारखान्याचा विस्तार झाल्यामुळे ४५० कोटी रुपयांचे उत्पादन वाढेल, ३००० कामगारांना नोकऱ्या मिळतील, चिखलीच्या शेतकऱ्यांनी जमीन दिली नाही तर टाटा गुजराथेत जाण्याचा विचार करतील, तेथे सरकारने त्यांना फुकट जमीन देऊ केली आहे अशा धमक्याही शहाजोग मंडळी देऊ लागली. आणि सर्वात शेवटी, १५ मे १९९३ रोजी शरद पवारांनी गर्जना केली. 'ही जमीन द्यायचे ठरले आहे, आम्ही ती देणार आहोत. या जमिनीवर शेतकरी शेती करत असतील तर ते अतिक्रमण आहे. जमीन देण्यास विरोध केला तर तो आम्ही मोडून काढू..... इत्यादी'

### शेतकऱ्यांचा लढाईचा निर्धार

चिखलीने हे आव्हान स्वीकारले आहे. राष्ट्रीय हिताच्या आड येण्याचा त्यांचा कोणताही हेतू नाही. कारखान्याच्या विस्ताराच्या आड येण्याची त्यांची मुळीच इच्छा नाही. सरकारने त्यांची भूमी संपादन केली आहे हे मुळी त्यांना मान्य नाही. जमिनीचे मालक शेतकरी आहेत, त्यांची वहिवाट चालू आहे. टेल्कोला व्यवहार करायचा असेल तर तो त्यांनी परस्पर शेतकऱ्यांशी केला पाहिजे, प्राधिकरणाशी नाही. आता या जमिनीकरिता शेतकऱ्यांच्या हातावर एकरी ४००० रुपये टिकवण्याची भाषा झाली, तीच जमीन प्राधिकरणाने, त्यात एक दगडही इकडचा तिकडेसुद्धा हलवला नाही तरी आता २२ लाख रुपये एकराची झाली आहे. टेल्कोला ११ लाख रुपयांस दिली जात आहे आणि त्याचा फायदा प्राधिकरणाशी संबंधित टोळभैरव अधिकारी आणि पुढारी घेणार आहेत. हे शेतकऱ्यांना मान्य नाही. यासाठी लढा देण्याची त्यांनी तयारी केली आहे. आणि महाराष्ट्रभरचे शेतकरी त्यांना साथ देतील असा त्यांना विश्वास आहे.

### हीही खुल्या अर्थव्यवस्थेची लढाई

नेहरू व्यवस्थेत शेतकऱ्यांना भरडण्याची अनेक साधने वापरण्यात आली. शेती तोट्यात ठेवण्याची धोरणे आणि शहरांना पोसण्याची धोरणे यथास्थित चालली. शेतकऱ्यांना भरडण्याच्या या साधनात भू-संपादनाचा कायदा अत्यंत अन्यायी आणि कठोर म्हटला पाहिजे. आता नेहरूव्यवस्था संपली आहे, खुल्या व्यवस्थेकडे वाटचाल सुरू झाली आहे. अर्थव्यवस्थेतील सरकारी हस्तक्षेप मोडून काढण्याचा शेतकऱ्यांनी निर्धार केला आहे. ३० जानेवारी १९९३, रोजी सेवाग्राम येथे ३१ मार्च १९९३ रोजी लालकिल्ल्यावर शेतकऱ्यांनी खुल्या अर्थव्यवस्थेसाठी लढण्याचा आपला निर्धार जाहीर केला. शहरीकरणास सामोऱ्या आलेल्या शेतजमिनींबद्दल काय व्यवस्था असावी यासंबंधी

'राष्ट्रीय कृषि नीती'च्या मसुद्यात स्थायी कृषि सल्लागार समितीने म्हटले आहे,

'५६. मोठी शहरे आणि महानगरे यांच्या सीमांवरील शेतकऱ्यांना एका गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे. शहरांच्या विस्तारासाठी त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जात आहेत. या जमिनी सामान्यतः कमीत कमी किंमत देऊन ताब्यात घेतल्या जातात. या जमिनींची थोडीफार सुधारणा केल्यानंतर त्यांना भरमसाठ किंमती मिळतात. ज्या शेतकऱ्याला आपले हे उपजीविकेचे साधन सोडणे भाग पाडले जाते, त्याला जमिनीच्या मिळालेल्या तुटपुंज्या किंमतीतून नवा उद्योगव्यवसाय सुरू करणे मुश्किल होऊन बसते. यापुढे, जमिनीमधून उत्पादन काढीत असलेल्या शेतकऱ्याला आपली जमीन सोडण्यास भाग पाडले जाणार नाही असे धोरण राहील. शेतकरी जी जमीन कशीत नसतील त्या जमिनींचा विकास करून संबंधित नगर विकास अधिकाऱ्याने मंजूर केलेल्या योजना व आराखड्यानुसार प्लॉट पाडण्याची व नंतर ते खुल्या बाजारभावाने विकण्याची परवानगी अशा जमिनींच्या मालकांना व्यक्तिगत अथवा एकत्रित जबाबदारीवर देण्यात येईल. अशा तऱ्हेने जमिनीचा विकास करणे शेतकऱ्याच्या कुवतीबाहेर असेल तर त्याला विकासखर्च वजा जाता विकसित जमिनीच्या किंमतीच्या जवळपास किंमत मिळाली पाहिजे.'

(राष्ट्रीय कृषिनीती; शरद जोशी; पृ. ३७, ३८)

### मावळे पुन्हा इतिहास घडवणार

खुल्या अर्थव्यवस्थेत सरकारी भूसंपादनास आर्थिक क्षेत्रात तरी स्थान नाही. भूसंपादनाचा कायदा मोडीत काढण्यासाठी मावळातील शेतकरी उठतो आहे. मावळाचा शेतकरी उठतो तेव्हा तेव्हा इतिहास घडतो हाही इतिहास आहे. आपले शिवार वाचवायला चिखली सज्ज झाली आहे. इतर शेतकऱ्यांनाही आपल्याला शिवाराच्या रक्षणासाठी उभे राहावे लागेल.

●

## खंडपीठाच्या निर्णयाने 'साखर सम्राटां'चे धाबे दणाणले

# बिगर सभासद उत्पादकांना ऊसविक्रीची पूर्ण मुभा

बिगर सभासद ऊसउत्पादकांना कोणत्याही कारखान्याला ऊस घालण्याची मुभा आणि प्रतिटनाला ८५० रुपये भाव देण्याचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिल्यामुळे अनेक साखरसम्राटांचे धाबे दणाणले आहे.

नगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातील गिरवली गावचे अभिमन्यू कोळसे व इतर शेतकऱ्यांनी औरंगाबादमधील गंगापूर सहकारी साखर कारखाना बिगर सभासदांना चांगला भाव देत नाही म्हणून न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती बी. एन. देशमुख आणि न्यायमूर्ती दाणी यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाल्यानंतर त्यांनी बिगर सभासदांना ८५० रुपये भाव द्यावा आणि त्यांना कोणत्याही कारखान्याला ऊस घालता येईल असा निर्णय दिला. या निर्णयामुळे बिगरसभासद शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून, अनेक वर्षांपासून साखर कारखान्यांकडून चालू असलेली पिळवणूक थांबेल, अशी भावना त्यांच्यात वाढीला लागली आहे.

अनेक साखर कारखान्यांचे अध्यक्ष व संचालक मंडळ हे राजकीय किंवा अन्य कारणांमुळे ऊसउत्पादक शेतकऱ्यांना कारखान्याचे सभासद करून घेत नाहीत. असे लाखो शेतकरी महाराष्ट्रात आहेत की ज्यांनी सभासदत्व मिळावे म्हणून कारखान्याकडे अर्ज केले. साखर आयुक्त कार्यालयानेही त्यांना सभासद करून घेण्यासंबंधी आदेश दिले; परंतु कारखान्यांनी जुमानले नाही. उसाचा तुटवडा भासला की बिगर सभासदांचा ऊस घेण्यासाठी कारखान्यांमध्ये स्पर्धा वाढीला लागून शेतकऱ्यांना पैसे चांगले मिळतात. पण ऊस मुबलक उपलब्ध असला की बिगर सभासदांना कुणी विचारत नाही. पाडून ऊस मागितला जातो. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी आपले ऊस जनावरांना चारा म्हणून खाऊ घातले किंवा पेटवून दिले आणि अनेकांचे ऊस पाण्याअभावी जळून गेले. या वर्षी सातारा, पुणे, सोलापूर, नगर, परभणी, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये गळीत क्षमतेपेक्षा थोडा जास्त ऊस उपलब्ध आहे. तर कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बुलढाणा आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांत पुरेसा म्हणजे गळीत क्षमतेइतका ऊस उपलब्ध आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये मात्र ऊसाचा तुटवडा आहे. जिथे जास्तीचा ऊस उपलब्ध आहे तिथे बिगर सभासदांचे हाल चालू आहेत. शिरूर तालुक्यातील वडगाव रासाई, मांडवगण फराटा या परिसरांत सुमारे तीन लाख टन ऊस उपलब्ध असून, तेथील शेतकऱ्यांनी सुरूवातीला ११०० रुपये भाव मिळावा, अशी मागणी केली होती. नंतर ही मागणी कमी होत होत आता पावणेआठशेवर आली असल्याचे समजते.

जुन्नर तालुक्यातील विघ्नहर कारखान्याने पावणेआठशेपेक्षा अधिक भाव ९४-९५ मध्ये बिगर सभासदांना देणे शक्य नाही, अशी भूमिका घेतली. इतर कारखान्यांनी तर ७५० रुपयांचाच भाव फोडला. अखेरीस नाइलाजास्तव शेतकऱ्यांनी पावणेआठशे रुपयांनी करार करून आता ऊसाची तोडणी जोरात चालू केल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाला खूप महत्त्व आहे. *(सकाळ १६ डिसेंबर १९९४ वरून साभार)*

# शेतकरी संघटनेचा विजय असो

# शेतकरी संघटनेचे चिखली येथे ठिय्या आंदोलन

पुणे जिल्ह्याच्या चिखली परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने बळकाविण्याच्या प्रकाराला विरोध करण्यासाठी तसेच शेतकऱ्याच्या इच्छेविरुद्ध भूमिसंपादन करण्याच्या एकूण धोरणाला विरोध करण्यासाठी शेतकरी संघटना २५ डिसेंबर १९९४ पासून चिखली परिसरातील त्या वादग्रस्त ठिकाणी ठिय्या आंदोलन सुरू करणार असून त्यात महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून पन्नास हजाराहून अधिक शेतकरी स्त्रीपुरुष सहभागी होण्यासाठी येतील.

**भूमिका**

चिखली येथील जमिनी 'टेल्को' या कंपनीला विस्तारासाठी पाहिजे असल्या तरी त्यांनी त्या, त्या जमिनींच्या मालक शेतकऱ्यांकडून त्यांच्याशी वाटघाटी करून बाजारभावाने विकत घ्याव्यात अशी तेथील शेतकरी आणि शेतकरी संघटनेची भूमिका आहे. जमिनीचे मालक शेतकरी असल्याने 'पिंपरी-चिंचवड महानगर प्राधिकरण' किंवा इतर संस्था अगर व्यक्तींना या जमिनीचे हस्तांतरण करण्याचा काहीच अधिकार पोहोचत नाही. ही भूमिका शेतकरी संघटनेने या आधी टेल्को कंपनीच्या संचालकांना कळविली होती. तरीही, टेल्कोचे अधिकारी शेतकऱ्यांशी वाटाघाटी करण्याचे सोडून या जमिनीवर पिंचिंमवि प्राधिकरणाच्या सांगण्यावरून ताबा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांना असलेला विरोध संबंधित शेतकऱ्यांनी वेळोवेळी कृतीने व निवेदनांनी प्रकट केला आहे. शिवाय, मालकीसंबंधी निर्णय लावण्याची न्यायालयीने प्रक्रिया सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ज्या निकालाच्या आधारे टेल्को कंपनी प्राधिकरणाचे अधिकारी व महाराष्ट्र शासनाचे पोलिस यांच्या साहाय्याने सदर जमिनीवर कब्जा करू पाहात आहे त्या निकालात सदर जमिनींची (वहिती, मालकी इ. संबंधी) 'वस्तुस्थिती' तपासण्याचे कामे सदर न्यायालयाच्या कार्यकक्षेत येत नसल्याने अर्जदारांना अर्ज मागे घेण्याची परवानगी दिली आहे.

**आंदोलन टेल्को विरुद्ध नाही**

सकृत्‌दर्शनी वाटत असले, तरी शेतकरी संघटनेचे हे ठिय्या आंदोलन 'टेल्को'च्या विस्तार-कार्यक्रमाविरुद्ध नाही; शेतकऱ्यांच्या मालकीहक्कासाठी आहे. 'टेल्को'ला आपल्या विस्तार-कार्यक्रमासाठी या जमिनी आवश्यक असतील तर कंपनीने संबंधित शेतकऱ्यांशी किंमतीबाबत वाटाघाटी करून किंमत ठरवून विकत घ्याव्यात ही शेतकरी संघटनेची आग्रही भूमिका आहे. चिखली येथील जमिनींचे हे प्रकरण खूप जुने आहे. शेतकऱ्यांना अंधारात ठेऊन पिंचिंमवि प्राधिकरणाने टेल्कोबरोबर या जमिनींसंबंधी बोलणी केली. त्याबाबतीत झालेले सर्व व्यवहार शेतकरी संघटना बेकायदेशीर मानते.

चिखलीच्या जमिनींचे बळजोरी 'संपादन' हे शासनाने स्वतःहाती घेतलेल्या 'भूसंपादना'च्या अधिकाराचे एक उदाहरण आहे. शासनाच्या या अधिकाराचा फटका सर्वच भागातील शेतकऱ्यांना बसला आहे, बसत राहाणार आहे. त्याच्या विरोधात संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली हे ठिय्या आंदोलन करणार आहेत.

(१) 'टेल्को'ने संबंधित शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष वाटाघाटी करून बाजारभावाने जमिनीच्या किंमती शेतकऱ्यांना द्याव्या;

(२) 'टेल्को'सारखा प्रथितयश उद्योगसमूह बाजारभावापेक्षा कितीतरी कमी किमतीने जमिनी ताब्यात मिळविण्यासाठी प्राधिकरण व शासनाच्या पोलिसांच्या मदतीने शेतकऱ्यांवर अन्याय करण्यास मजबूर होते याला दरम्यानच्या काळात कंपनीने या बेकायदेशीर व्यवहारात मुख्यमंत्री, प्राधिकरण किंवा अन्य कोणास दिलेली अनधिकृत 'उचल' असल्यास कंपनीने तपशीलवार जाहिर करावे.

असे आवाहन शेतकरी संघटना करीत आहे. या दोन गोष्टीत कंपनी पाऊल उचलेपर्यंत शेतकऱ्यांचे हे ठिय्या आंदोलन चालू राहील.

प्रजासत्ताक भारताच्या मूळ घटनेत 'प्रत्येक नागरिकाला मालमत्ता संपादन करण्याचा, तिचा उपभोग घेण्याचा, तिची विल्हेवाट लावण्याचा, मालमत्ता हक्क त्रच्तवचमतजल तपहीजत्र समाविष्ट आहे. परंतु, शासनाने नंतर घटनेमध्ये दुरूस्त्यांच्या नावावर मोडतोड करून सर्वसामान्य नागरिकांचा हा हक्क दुरावून घेतला आहे. या हक्काच्या पुर्नप्रस्थापनेसाठी सर्व स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन शेतकरी संघटनेतर्फे करण्यात येत आहे.

**— शरद जोशी**

## स्वतंत्र भारतची बैठक

'स्वतंत्र भारत'च्या महाराष्ट्र शाखेची सभा शनिवार दिनांक २४ डिसेंबर १९९४ रोजी सकाळी ११ ते ५ या वेळात केशव सभागृह, १३६० शुक्रवार पेठ, पुणे २. (सरस्वती विद्यालयाजवळ) येथे होणार आहे.

फेब्रुवारी १९९५ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या कार्यक्रमाची आखणी, प्रचाराची रणनीती, प्रचारसाहित्य इत्यादींविषयी या सभेत निर्णय घेण्यात येतील.

**सौ. सरोजा परूळकर**
पुणे जिल्हा संयोजक,
**स्वतंत्र भारत**

**मोरेश्वर टेमुर्डे,**
महाराष्ट्र-संयोजक
**स्वतंत्र भारत**

**रास्ता रोको १ डिसेंबर १९९४**

मोरेवाडी (अंबाजोगाई) येथे पाण्याच्या टाकी चौकात श्री. श्रीरंगराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली ११० महिला व २७६ पुरुषांनी रास्ता रोको आंदोलन केले. बीड जिल्ह्यात या खेरीज गिरवली, बोरी सावरगाव, दिंद्रूड, मालीपारगाव, अंबाजोगाई साखर कारखाना, जवळगाव, देवळा इत्यादि वीस ठिकाणी हे आंदोलन झाले.

*(प्रेषिका : सौ. साधना मोरे)*

**रास्ता रोको १ डिसेंबर १९९४**

वाळवा तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने पेठ नाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. प्रमुख नेते सदाशिव खोत, माणिक पाटील, सुरेश पाटील, उत्तम पाटील, राजाराम थोरात, सुमन शिंदे, उत्तम कुंभार, लक्ष्मण टूके. याखेरीज जिल्ह्यात उमदी व मिरज येथेही हे आंदोलन यशस्वीपणे पार पडले.

*(प्रेषक : स. रा. खोत)*

**गुंडा पाटी जि. परभणी येथील रास्ता रोको १ डिसेंबर १९९४**

भुकेजलेल्या प्रवाशांना गुंडा येथील गावकऱ्यांनी गावातून स्वयंपाक करून आणून जेऊ घातले.

*(प्रेषक : रामकिशन अप्पा रुद्राक्ष, जवळा-बाजार)*

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On December 21, 1994

To

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 21, 1994

PNCW 281

Licence to post without prepayment
No. 87

# स्वातंत्र्य रक्षणासाठी ठिय्या आंदोलन

१ डिसेंबर १९९४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रभर मोठ्या संख्येने रास्ता रोको आंदोलन करून शासनाच्या शेतकरीविरोधी कारवायांना असलेला आपला विरोध शेतकऱ्यांनी प्रकट केला. पण, शासनाने या कारवाया बंद करण्याबाबत अजून काहीही उच्चार केलेला नाही.

★ कापूस-ऊसउत्पादक शेतकऱ्यांवर ते आपला माल विक्रीसाठी नेत असता अन्याय, अत्याचार होतच आहेत.

★ सरकार शेतकऱ्याचेच प्रचंड देणे लागत असतांना, सोसायट्या बँकांचे अधिकारी कर्जवसुलीच्या नावाने पठाणी कारवाया करीत आहेत.

★ उणे-सबसिडीबद्दल खुलासा मागणाऱ्या शेतकऱ्यांना तुरुंगात जावे लागते.

★ शेतीमालांच्या (उदा. लोणी) आयातीच्या योजना अजूनही आखल्या जात आहेत.

१ डिसेंबर १९९४ रोजी रास्ता रोको करून शेतकऱ्यांनी शासनास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता.

चिखली-कुदळवाडीच्या शेतकऱ्यांच्या जमिनींवर जबरदस्ती ताबा करण्याच्या (किंवा टेल्कोकडून करविण्याच्या) कारवाईने शासनाने शेतकऱ्यांच्या ताकदीला आव्हान दिले आहे. शासनाचे हे आव्हान शेतकऱ्यांनी स्वीकारले आहे.

## चिखली-कुदळवाडीच्या लढवय्यांना जन्म देणाऱ्या भूमीवर

शेतकरी संघटना

# ठिय्या आंदोलन

**रविवार दिनांक २५ डिसेंबर १९९४ पासून**

**ठिकाण : चिखली-कुदळवाडी, ता. हवेली, जि. पुणे**

***महाराष्ट्रभरातील सर्व शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने यावेळी हजर रहावे.***

**सौ. सरोज काशीकर**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

★ दिवस थंडीचे आहेत. चटणी-भाकरीखेरीज पुरेसे पांघरूणही आणावे.

★ चिखली हे गाव आळंदी-देहू मार्गावर मोशीपासून पश्चिमेला २ कि. मी. वर आहे. मोशी किंवा पिंपरी-चिंचवड वरून या गावी एस्.टी., पी.एम्.टी. किंवा पी.सी.एम्.टी. ने जाता येते.

★ फोन संपर्क : श्री. बाळासाहेब यादव, पुणे,
३२७५४८ / ७७४६५९ / ७७१८००

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.-०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.